क्र.सिडको/प्रशासन/माहितीचा अधिकार/2024/ दि. 07.02.2024

विषय : **मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार माहिती अधिकार कायदा कलम 4-1 ख अंतर्गत स्वयंप्रेरणेने पब्लिक डोमेनवर खाली नमूद 17 मुद्यांची माहिती तातडीने उपलब्ध करुन देत मा.न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणेबाबत निवेदन.**

संदर्भ : **1. अलर्ट सिटिझन्स फोरम नवी मुंबईचे सर्व सदस्य यांचा दि. 28.8.2023 रोजीचा ई-मेलद्वारे प्राप्त अर्ज.**
**2. मशा/सिएमओ/कों.वि/कक्ष-1/रजि.क्र.552/E-705966/2023/861 दि. 04.9.2023.**

आपणांस कळविण्यात येते की, वरील विषयांकीत संदर्भ क्र. 1 व 2 च्या पत्रानुसार विविध विभागांकडून मागविण्यात आलेली माहिती संकलित करुन मा. न्यायालयाच्या निर्देशानुसार माहिती अधिकार कायदा कलम 4-1 ख अंतर्गत स्वयंप्रेरणेने पब्लिक डोमेनवर 17 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्यानुसार खाली दिलेल्या तक्तामध्ये मध्ये 17 मुद्यांची माहिती देण्यात आलेली आहे.

| क्र. | मुद्दा | संबंधित विभागाकडून प्राप्त झालेली माहिती |
|---|---|---|
| 1 | आपली रचना, कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील. | सदर माहिती सिडको महामंडळाच्या संकेतस्थळावर सिडकोबद्दल "सिडको" या शिर्षकाखाली उपलब्धआहे. |
| 2 | आपले अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये. | सदर माहिती सिडको महामंडळाच्या संकेतस्थळावर "Contact us" या शिर्षकाखाली उपलब्ध आहे. |
| 3 | निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली. | सदर माहिती सिडको महामंडळाच्या संकेतस्थळावर "विभाग व कार्ये" या मथळयाखाली उपलब्ध आहे. |
| 4 | स्वत:ची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांच्याकडून ठरविण्यात आलेली मानके. | सदर माहिती सिडको महामंडळाच्या संकेतस्थळावर "Board Resolution" - "अधिकार वाटप" या सदराखाली उपलब्ध आहे. |
| 5 | त्यांच्याकडे असलेले किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेले किंवा त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनिमय, सूचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख. | सदर माहिती सिडको महामंडळाच्या संकेतस्थळावर "विभाग निहाय" या शिर्षकाखाली उपलब्ध आहे. |
| 6 | त्याच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण. | सदर माहिती संबंधित विभागामध्ये उपलब्ध आहे. |
| 7 | आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशिल. | सदर माहिती सिडको महामंडळाच्या संकेतस्थळावर "नागरी / व्यवसाय सेवा" या शिर्षकाखाली उपलब्ध आहे. |

| | | |
|---|---|---|
| 8 | आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तिंच्या मिळून बनलेल्या मंडळाचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण आणि त्या मंडळाच्या, परिषदाच्या समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबते विवरण. | सदर माहिती सिडको महामंडळाच्या संकेतस्थळावर "संचालक मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्त / व्यवस्थापन संरचना" या शिर्षकाखाली उपलब्ध आहे. |
| 9 | आपल्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची निर्देशिका म्हणजेच खात्यानिहाय, विभागनिहाय डेटा. | निरंक |
| 10 | आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला मिळणारे मासिक वेतन तसेच प्राधिकरणाच्या विनियमामध्ये तरतुद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याची पध्दत. | निरंक |
| 11 | सर्व योजनांचा तपशिल, प्रस्तावित खर्च दर्शविणारा आपला प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रकमांचा अहवाल. | सदर माहिती सिडको महामंडळाच्या संकेतस्थळावर "दृष्टीक्षेपात सिडको" या शिर्षकाखाली उपलब्ध आहे. |
| 12 | अर्थसहाय्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीची रित तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिकाऱ्यांचा तपशिल. | सिडको महामंडळामार्फत विविध ग्रामपंचायतीस अर्थसहाय्य पुरविले जाते. सदर तपशिल अभियांत्रिकी विभागाकडे उपलब्ध आहे.<br>तसेच सिडको महामंडळास केंद्र तसेच राज्य सरकारकडून विविध योजनांसाठी मिळालेल्या अर्थसहाय्यवाटपाचा तपशिल देखील अभियांत्रिकी विभागाकडे उपलब्ध आहे. |
| 13 | ज्या व्यक्तींना सवलती परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशिल. | निरंक |
| 14 | इलेक्ट्रॉनिक स्वरुपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशिल. | इलेक्ट्रॉनिक स्वरुपात असलेली माहिती ही सिडकोच्या वेगवेगळया विभागांकडून प्रणाली विभागाकडे सिडको वेबसाईटवर त्या त्या विभागाने विनंती केल्यावर प्रणाली विभाग वेब साईटवर अपलोड करत असते. त्यामुळे प्रणाली विभागाकडे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात असलेली माहिती उपलब्ध नाही. |
| 15 | माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या संविधांचा तपशिल तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशिल. | www.cidco.maharashtra.gov.in या वेबसाईटमध्ये नागरिक/व्यवसाय सेवा अंतर्गत – संवाद सिटीझन पोर्टल, ऑनलाईन CFC, ऑनलाईल 12.5%, कोपास, NMIAS, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गृहनिर्माण योजना, सार्वजनिक तक्रार, सामाजिक सेवा योजना, टेंडर्स, विकास परवानगी, सेवेचा अधिकार, कंत्राटदारांची नोंदणी, पर्यावरणीय नोंदणी, नागरिकांची सनद, अभियांत्रिकी सेवा इत्यादींचा समावेश आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशिल प्रणाली विभागाकडे उपलब्ध नाही.<br>सिडको महामंडळातील कर्मचारी व अधिकारी यांचेकरिता स्वतंत्र ग्रंथालय उपलब्ध असून सार्वजनिक वापराकरीता चालविण्यात येत नाही. तसेच ग्रंथालयाची वेळ ही सकाळी 9.30 ते संध्याकाळी 5.30 पर्यंत अशी आहे. |
| 16 | जन माहिती अधिकाऱ्यांची नावे, पदनामे व इतर तपशिल. | सदर माहिती सिडको महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| 17 | विहित करण्यात येईल अशी माहिती. | प्रणाली विभागाकडे उपलब्ध नाही. |

**(जगदिश राठोड)**
**महाव्यवस्थापक (प्रशासन)**
**सिडको, नवी मुंबई**